# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(सायंकाळ)**

**दिनांक १६.१०.२०२६ शुक्रवार**

**१) मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते उत्कृष्ट तपास करणारे पोलीस अधिकारी, अंमलदार व पैरवी अधिकारी यांचा गौरव :–**

मा. श्री विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांनी पोलीस आयुक्तालय अंतर्गत येणारे आर्थिक गुन्हेशाखा, सायबर, विशेष शाखा, पोलीस ठाणे लकडगंज, यशोधरानगर, पाचपावली, येथील उत्कृष्ट काम करणारे पोलीस अधिकारी व अंमलदार व पैरवी अधिकारी यांचा आज दिनांक १६.१०.२०२६ रोजी पोलीस भवन येथील दालनात प्रशस्तीपत्र देऊन त्यांचा गौरव केला.

ज्यामध्ये, पोलीस ठाणे वाठोडा येथे दाखल फसवणूकीचे गुन्ह्यात समांतर तपास करतांना, आर्थिक गुन्हेशाखा मार्फतीने योग्य तपास करून, मा. कोर्टात दोषारोप सादर केले. गुन्ह्यात ४ आरोपींविरूध्द दोषसिध्दी झाल्याने, मा. न्यायालयाने आरोपींना ०६ वर्षे कारावास व ५ वर्षे दंडाची शिक्षा सुनावली. करीता गुन्ह्यात तपास करणारे सपोनि. शरयु देशमुख व पोहवा. राजेश आंधळे, पोहवा. गजानन मोरे, जितेंद्र पदाळे व मपोहवा. भारती माडे यांना तसेच, पोलीस ठाणे लकडगंज हद्दीत अपहरणाच्या गुन्ह्यात बेपत्ता असलेल्या व्यक्तीचा व्यापक व बहुआयामी तपास करून, त्याचा शोध घेणारे वपोनि. मुकुंद कवाडे, पोउपनि. बालाजी माने, पोहवा. आनंद मरसकोल्हे, राकेश तिवारी, पोअं. मयुर बंनसोड व महेंद्र सेलुकर यांना, तसेच, पोलीस ठाणे लकडगंज हद्दीत घरफोडीच्या गुन्ह्यात आरोपी विरूध्द दोषसिध्दी होवून, मा. न्यायालयाने आरोपीस ०६ वर्षे व २०,०००/–रू. दंडाची शिक्षा सुनावली. करीता तपासात मदत करणारे पोहवा. पंकज दहापुते व कोर्ट पैरवी पोहवा. अमर काळे, पोअं. नितीन सातपूते, मपोअं. सुशीला धुर्वे यांना तसेच, पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीतील बलात्कार व लैंगिक अत्याचाराच्या गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यात आरोपीविरूध्द दोषसिध्दी होवून, मा. न्यायालयाने आरोपीस २० वर्षे व १०,०००/–रू. दंडाची शिक्षा सुनावली. करीता, गुन्हे तपास करणारे वपोनि. युनुसचॉद शेख, मसपोनि. मेधा बोखरे, पोअं. भुषन येरोजवार, दिग्वीजय वेरूळकर, मपोअं. नम्रता मेश्राम व कोर्ट पैरवी पोअं. मयुर लोहकरे यांना तसेच, पोलीस ठाणे पाचपावली हद्दीतील जबरी संभोगाच्या गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यात आरोपीविरूध्द दोषसिध्दी होवून, मा. न्यायालयाने आरोपीस २० वर्षे व २५,०००/–रू. दंडाची शिक्षा सुनावली. करीता गुन्ह्यात तपास करणारे सपोनि. तुळसीराम ढाकुलकर व कोर्ट पैरवी सफौ. राजेंद्र मोरई व मपोहवा. अपेक्षा बोदेले यांना, त्याचप्रमाणे, २१ व्या महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळावा–२०२६ पुणे येथे आयोजित स्पर्धेमधील वेगवेगळ्या विषय प्रकारात उल्लेखनिय कामगिरी करून, सुवर्ण, रोप्य व कांस्य असे एकुण १२ पदकांची कमाई करून राज्यात द्वितीय क्रमांक पटकाविणारे नागपूर शहरातील गुन्हेशाखेचे पोनि. प्रशांत ठवरे, डायल–११२ च्या श्रीमती मसपोनि. अश्विनी काळे, पोलीस ठाणे सक्करदरा येथील मपोहवा. रसीका घायवट, पोलीस ठाणे इमामवाडा येथील पोअं. कुणाल उके, पोलीस ठाणे सोनेगाव येथील मपोअं. प्रतिक्षा नागपूरे, पोलीस ठाणे कपिलनगर येथील पोअं. प्रकाश पाटणे, गुन्हेशाखा येथील पोअं. पलाश वाघमारे व श्वान पथकाचे पोहवा. सुखदेव धुर्वे, पोअं. अभय दंदी या सर्वांना प्रशस्तीपत्रक देवुन, अधिक उत्कृष्ट काम करण्यासाठी प्रोत्साहीत केले.

याप्रसंगी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सहा. पोलीस आयुक्त, मा. अपर पोलीस आयुक्त श्री. वसंतराव परदेशी (दक्षिण प्रभाग), श्रीमती विनीता शाहु (उत्तर प्रभाग) तसेच अधिकारी व अंमलदार हजर होत.









**<u>२) उत्कृष्ट तपास करणारे अधिकारी व अंमलदार यांचा मा. अपर पोलीस आयुक्त दक्षिण प्रादेशिक विभाग यांचे हस्ते गौरव :—</u>**

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय, दक्षिण प्रभाग अंतर्गत येणारे पोलीस ठाणे वाडी, हुडकेश्वर यशोधरानगर व नंदनवन येथे दाखल असलेल्या गुन्हयातील आरोपींचा शोध घेऊन गुन्हा उघडकीस आणून गुन्हयातील मुद्येमाल हस्तगत करणारे पोलीस अधिकारी व अंमलदार यांचा आज दिनांक १६.१०.२०२६ रोजी मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर यांनी त्यांचे कार्यालयात प्रशस्तीपत्र देऊन गौरव केला.

पोलीस ठाणे वाडी येथे दाखल घरफोडीचे गुन्ह्याचा योग्य व तांत्रीक तपास करून, आरोपीस निष्पन्न करून, आरोपीला अटक केली व आरोपीकडून १,६०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करणारे वपोनि. श्री. नितीन मगर, सपोनि. कुणाल धुरट, पोहवा. रोशन फुकट, राहुल बोटरे, रामेश्वर वर्धे, धर्मेंद्र यादव व विनोद कुंभलकर यांना, तसेच, पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे दाखल वाहनचोरीचे गुन्ह्याचा तांत्रीक तपास करून, आरोपीस निष्पन्न केले व आरोपीला अटक करून, त्याचेकडून गुन्ह्यातील चोरीचे वाहन किंमती १,२७,८९५/—रू. चा मुद्देमाल जप्त करणारे पोउपनि. सुमेध जाधव, पोहवा. संदीप पाटील, चेतन वैद्य, विजय सिन्हा यांना, तसेच, पोलीस ठाणे यशोधरानगर येथे दाखल घरफोडी व वाहनचोरीचे गुन्ह्याचा तांत्रीक तपास करून व गोपनिय माहीतीवरून आरोपीस निष्पन्न केले व आरोपीला अटक करून, त्याचेकडून ५,१२,२००/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आणि आरोपीकडुन ईतर ०४ वेगवेगळे गुन्हे उघडकीस आणणारे वपोनि. श्री. युनुसचॉद शेख, पोउपनि. अनंत पाटील, पोहवा. राहुल बोंदरे, अशोक तायडे, पोअं. मनिष झरकर, संदीप वानखेडे, शितेष चौरसिया, भुषण येरोजवार, प्रविण बावणकर, प्रविण ईनवाते यांना, तसेच, पोलीस ठाणे नंदनवन येथे दाखल जबरी संभोग व पोक्सो

कायद्यांतर्गत गुन्ह्यात आरोपीचा शोध घेवुन, अटक करून, त्याचेविरूध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले. आरोपीविरूध्द दोषसिध्दी होवून मा. न्यायालयाने आरोपीस २० वर्षे सश्रम कारावास व ४५,०००/—रू. दंडाची शिक्षा व दंड न भरल्यास ०१ वर्षे अतीरिक्त कारावासाची शिक्षा सुनावली. करीता वपोनि. कैलास देशमाने, मपोहवा. अलका ठेंगरे, पोअं. अमोल कोठीया या सर्वांना प्रशस्तीपत्रक देवुन त्यांचा सत्कार करून, भविष्यात अधिक उत्कृष्ट काम करण्यासाठी त्यांना प्रोत्साहीत केले.



**(कामगिरी)**

**१) ईमामवाडा पोलीसांची कामगीरी :— ऑटो चोरी करणाऱ्या आरोपीस अटक.**

फिर्यादी शुभम शामलाल उईके, वय २९ वर्षे, रा. चंद्रमणी नगर, गल्ली नं. ८, प्रफुल्ल सोमकुंवर चे घरी किरयाने, अजनी, नागपूर यांचे हाताला मार लागल्याने, त्यांना त्यांचा ऑटो क्र. एम. एच ४९ ए.आर ४४१४ चालविता येत नव्हता. त्यामुळे त्यांनी त्यांचे शेजारी राहणारा सुरज गायतोंडे, वय ३५ वर्षे यांना ऑटो चालविण्यास देवुन, फिर्यादीचे सासुला बसस्टॅण्ड येथे सोडण्यास सांगीतले. सुरज गायतोंडे बसस्टॅण्ड येथुन ऑटो घेवुन परत येत असतांना, त्यांनी ऑटोचे ब्रेक जोरात दाबल्याने त्यांचा अपघात झाल्याने, त्यांचे हाताला मार लागला. त्यामुळे त्यांनाही ऑटो चालविता येत नसल्याने ते पोलीस ठाणे ईमामवाडा हद्दीत बैद्यनाथ चौक—मेडीकल चौक रोडवरील होंडा शोरूम समोर ऑटो उभा करून, उपचारकामी हॉस्पीटल येथे जात असल्याचे त्यांनी फिर्यादी यांना फोन करून सांगीतले. दिनांक ११.१०.२०२६ चे १०.०० वा. ते १३.०० वा. चे दरम्यान, घटनास्थळावरील लॉक करून, पार्क करून ठेवलेला फिर्यादीचा ऑटो किंमती ४०,०००/—रू. चा कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेला. अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे ईमामवाडा येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

ईमामवाडा पोलीसांनी गुन्ह्याचा तपास करीत असतांना, त्यांना पेट्रोलींग दरम्यान, पोलीस ठाणे हद्दीत चारखंबा जवळील टि.बि वार्ड चौक येथे एक ईसम ऑटोसह संशयीतरित्या दिसुन आल्याने, त्याचे जवळ जावुन, त्या ईसमाचे नांव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव मंगेश आसाराम गोडबोले, वय ३४ वर्षे, रा. सावित्रीबाई फुले नगर, गल्ली नं. ४, मानेवाडा रोड, नागपुर असे सांगीतले. त्यास त्याचे ताब्यातील ऑटोबाबत कागदपत्रांची विचारणा केली असता, त्याने उडवा—उडवीचे उत्तरे दिल्याने, त्यास ऑटोसह ताब्यात घेतले. त्यास ऑटोसह पोलीस ठाणे येथे आणुन ऑटोबाबत अधिक तपास केला असता, पोलीस ठाणे येथे ऑटो क्र. एम. एच ४९ ए.आर ४४१४ बाबत चोरीचा गुन्हा दाखल असल्याचे दिसुन आले. आरोपीस अधिक सखोल विचारपुस केली असता, त्याने दिनांक रोजी ११.१०.२०२६ रोजी नमुद ऑटो चोरी केल्याची कबुली दिली. पंचासमक्ष आरोपीचे

ताब्यातुन ऑटो किंमती ४०,०००/—रू. चा जप्त करण्यात आला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती रश्मीता राव, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ४), मा. श्री. महेश चव्हाण, सहा. पोलीस आयुक्त (सक्करदरा विभाग), वपोनि. जयवंत पाटील यांचे मार्गदर्शनाखाली, पोउपनि. अजय कव्हर, पोहवा. विरेंद्र गुळरांधे, पोना. हरीष कांबळे, पोअं. कैलास कोठुळे व अजय मिराशे यांनी केली.

**२) पाचपावली पोलीसांची कामगिरी :— गोवंशीय जनावरांना निर्दयतेने व क्रुरपणे कत्तलीकरीता कोंडुन ठेवणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.**

**अ)** दिनांक १६.१०.२०२६ चे ०६.०० वा. ते ०७.१५ वा. चे दरम्यान, पाचपावली पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, टेका नाका रोडवरील, मक्का मस्जीद जवळ गोवंशीय जनावरांना कत्तलीकरीता बांधून ठेवलेले आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, नमुद ठिकाणी जावुन पंचासमक्ष पाहणी केली असता, तेथे लहान मोठी ०७ गोवंशीय जनावरांना अत्यंत क्रुरपने व निर्दयतेने दाटीवाटीने कोंडून चारापाणी न देता बांधून ठेवलेल्याचे दिसून आले. नमुद जनावरांचा मालकाबाबत चौकशी केली असता, आरोपी मोहम्मद इब्राहिम इस्तेखान अहमद अन्सारी, वय २३ वर्षे, रा. प्लॉट नं. ४२६, कुंदनलाल गुप्ता नगर, यशोधरानगर, नागपूर याची असून, त्याने गोवंशीय जनावरांना अवैधरित्या कत्तलीकरीता बांधुन ठेवल्याचे निष्पन्न झाले. घटनास्थळाहुन एकुण ०७ गोवंशीय जनावरे व नॉयलॉन दोरी असा एकुण किंमती अंदाजे १,७५,७००/—रू. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. गोवंशीय जनावरे यांना गौरक्षण केंद्र, नागपुर येथे दाखल करण्यात आले आहे. पोलीस ठाणे पाचपावली येथे आरोपीविरूध्द कलम ५, ५(ब)(क), ९(ब) महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम—१९७६, सुधारणा कायदा १९९५, सहकलम ११(इ)(फ) प्राणी क्रुरता अधिनियम —१९६० अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे व पुढील तपास सुरू आहे.

**ब)** दिनांक १६.१०.२०२६ चे ०८.३० वा. ते १०.३० वा. चे दरम्यान, पाचपावली पोलीसांचे बिट मार्शल यांना माहिती मिळाली की, टेका नाका रोडने, मक्का मस्जीद जवळून टाटा कंपनीचे मालवाहु गाडीतुन गोवंशीय जनावरांची कत्तलीकरीता वाहतुक केली जाणार आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, नमुद ठिकाणी सापळा रचून एका टाटा कंपनीचे मालवाहु गाडी क्र. एमएच ४८ टी ७८५५ ला थांबवून पाहणी केली असता, त्यामध्ये लहान मोठी ०७ गोवंशीय जनावरांना अत्यंत क्रुरपने व निर्दयतेने दाटीवाटीने कोंबून व बांधून त्यांची वाहतुक करीत असल्याचे दिसून आले. वाहन चालकास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव अब्दुल सादिक अब्दुल रशिद कुरेशी, वय ४५ वर्षे, रा. टेका, चिराग अली चौक, नागपूर असे सांगीतले. आरोपीस गोवंशीय जनावरांबाबत विचारणा केली असता, त्याने नमुद जनावरांना कत्तलीकरीता वाहुन नेत असल्याचे सांगीतले. घटनास्थळाहुन एकुण ०७ गोवंशीय जनावरे, मालवाहु गाडी व नॉयलॉन दोरी असा एकुण किंमती अंदाजे ६,९५,५००/—रू. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. गोवंशीय जनावरे यांना गौरक्षण केंद्र, नागपुर येथे दाखल करण्यात आले आहे. पोलीस ठाणे पाचपावली येथे आरोपीविरूध्द कलम ५, ५(ब)(क), ९(ब) महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम—१९७६, सुधारणा कायदा १९९५, सहकलम ११(इ)(फ) प्राणी क्रुरता अधिनियम —१९६० अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राहुल मदने, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ३), मा. श्री. शिप्रसाद पारवे, सहा. पोलीस आयुक्त (लकडगंज विभाग), वपोनि. जितेंद्र बोबडे यांचे मार्गदर्शनाखाली, सपोनि. सचिन भोंडे, पोहवा. अंकुश राठोड, पवन भटकर, प्रकाश पखान, वासुदेव जयपूरकर पोअं. आशिष बावणकर, अतुल फडकरे, ओमप्रकाश बर्डे यांनी केली.

**(गुन्हे)**

**पोलीस ठाणे इमामवाडा :—शस्त्रासह धुमधाम करणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक १६.१०.२०२६ चे ०६.२० ते ०७.०० वा. चे सुमारास, इमामवाडा पोलीसांचे बिट मार्शल हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, रामबाग, हनुमान मंदीरजवळ एक इसम येणाऱ्या—जाणाऱ्या लोकांना शिवीगाळी करून, धुमाकुळ घालीत आहे. अशा सुचनेवरून तेथे गेले असता, प्राप्त वर्णनाचा इसम धुमाकुळ घालतांना दिसून आला. त्यास घेराव टाकुन ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव निखील उर्फ निक्कु सुरज यादव, वय २२ वर्षे, रा. अंबे नगर, बादल किराणा स्टोअर्स जवळ, पारडी, नागपूर, ह.मु.—रामबाग, मिलींद बुध्द विहाराजवळ, इमामवाडा, नागपूर असे सांगीतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे कंबरेत पॅन्टचे आंत एक लोखंडी चाकु किंमती २००/—रू. चा मिळून आल्याने जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु बाळगून धुमधाम करतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सर तर्फे फिर्यादी पोअं. विनोद चव्हाण यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे इमामवाडा येथे पोउपनि. मारूती पवार यांनी आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे गणेशपेठ :—** दिनांक १५.१०.२०२६ चे १९.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे गणेशपेठ हद्दीत, दोसर वैश्य चौक, रोडवर एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ५० ते ५५ वर्षे वयाचे, रंग सावळा, बांधा मजबुत, अंगात आकाशी निळ्या रंगाचा फुलशर्ट व जिन्स घातलेला, पायात मोजे व कंबरेत लाल रंगाचा बेल्ट घातलेले इसम बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे गणेशपेठ येथे संपर्क साधावा.

याप्रकरणी फिर्यादी श्रीकांत मनोहर टिकले, वय ३९ वर्षे, रा. तेलीपूरा, तहसील, नागपुर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे गणेशपेठ येथे अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(मिसींग)**

**पोलीस ठाणे पारडी :—** फिर्यादी सिध्दार्थ पंजाबरावजी गजभिये, वय ४७ वर्षे, रा. शिवशक्ती नगर, तितरे यांचे घरी किरायाने, पारडी, नागपूर यांनी पोलीस ठाणे पारडी येथे तक्रार दिली की, त्यांची पत्नी नामे सौ. पुजा सिध्दार्थ गजभिये, वय २८ वर्षे ह्या दिनांक ११.१०.२०२६ रोजीपासुन आपले राहते घरून बेपत्ता आहेत. त्यांचा शोध घेतला असता, मिळून आल्या नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांना फुस लावून पळवून नेले असावे. अशा फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे पारडी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम १४०(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **वर्णन** रंग—गोरा, चेहरा—गोल, बांधा—मध्यम, उंची—५ फुट १ इंच, डोळे—घारे, नाक—सरळ, केस—काळे लांब, अंगात— निळा सलवार व निळा दुप्पटा घातलेले आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात.



सौ. पुजा

(ईतर)

**<u>आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :–</u>**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. १२ वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | २७५९५/ २०१९ | कलम ८२ सीआरपीसी प्रमाणे | रोशन शेख कयुम शेख, वय ३० वर्षे, रा. उत्कर्ष निर्माण दुसरा माळा, फ्लॅट नं. २०१, डॉमिनोज पिज्जाचे वर, के टी नगर ,काटोल रोड गिट्टीखदान, नागपूर. | १९.१०.२०२६ |
| २ | मा. १२ वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | ३०४०७६/ १९९९ | कलम ८२ सीआरपीसी प्रमाणे | १) गणेश जगलाल राणे, २) प्रकाश नारायण डकाट, वय ६३ वर्षे, दोन्ही रा. नविन वस्ती दुर्गा मंदीर जवळ, सदर, नागपूर. | २२.१०.२०२६ |

**स्वा/–**

**( अंकुश राठोड )**

**पोलीस उप निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**